॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✻ सुविचार ✻
दुसऱ्याला मदत करण्यासाठी श्रीमंतीची नाही, तर चांगल्या मनाची गरज असते.

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ | ■ वर्ष ७ वे ■ अंक ११४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये | ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पर्वाला सुरुवात!

राष्ट्रपतींच्या हस्ते नाशिकला तर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्र्यंबकेश्वरला धर्मध्वजारोहण सोहळा

● नाशिक । वीरभूमी – कुंभनगरी नाशिकमध्ये आजपासून (शनिवार, ३१ ऑक्टोबर) ऐतिहासिक सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधील सिंहस्थ कुंभमेळा पुढील वर्षापर्यंत सुरू राहणार असून यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वरचा मोठा विकास करण्यात आलेला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नाशिकमधील रामकुंडावर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्तावर ऐतिहासिक ध्वजारोहण करण्यात आले.

ज्या दिवसाची प्रतीक्षा नाशिककरांसह अवघ्या महाराष्ट्र आणि देशवासीय करत होते तो दिवस अखेर उगवला आहे. दुपारी बरोब्बर १२ वाजून २ मिनिटांनी ऐतिहासिक कुंभमेळा पर्वाला सुरूवात झाली. ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व असलेल्या नाशिक आणि त्र्यंबकेश्वर म्हणजेच त्र्यंबक नगरीत आता अधिकृत सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. रामतीर्थावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत यज्ञाहुती, गोदावरी पूजन आणि ध्वजपूजनाचे विधी पार पडले. पुरोहितांच्या मंत्रघोषात राष्ट्रपतींच्या हस्ते भगवी धर्मध्वजा फडकताच शंखनादाने परिसर दुमदुमून गेला. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, मंत्री छगन भुजबळ यांच्यासह केंद्रीय मंत्री, राज्य मंत्रिमंडळातील सदस्य, लोकप्रतिनिधी आणि विविध आखाड्यांचे महंत या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरले. गोदावरीच्या साक्षीने झालेल्या या सोहळ्याने नाशिकच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवले.

त्र्यंबकेश्वरच्या कुशावर्त तीर्थावरही पहाटेपासूनच धार्मिक उत्सवाची लगबग होती. मुख्यमंत्री फडणवीस आणि शृंगेरीपीठाचे जगद्गुरू शंकराचार्य विधुशेखर भारती यांच्या प्रमुख उपस्थितीत गोदावरी पूजन, संकल्पविधी, गणेशपूजन आणि ध्वजस्तंभ पूजन करण्यात आले. त्यानंतर शंकराचार्य आणि मुख्यमंत्र्यांनी धर्मध्वजेचे पूजन व प्रदक्षिणा केली. वैदिक मंत्रोच्चार, शंखनाद आणि धार्मिक जयघोषात धर्मध्वजा आकाशात फडकताच कुशावर्त परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. विविध आखाड्यांचे साधू-महंत, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

कुंभपर्वाचा आरंभ करण्यासाठी ध्वजारोहण सोहळ्यासाठी वर्षभरापासून नाशिकमध्ये विकासकामांचा धडाका सुरू होता. तर दोन दिवसांपासून नाशिकसह आणि त्र्यंबकेश्वर ध्वजारोहण सोहळ्यासाठी सजवायला सुरूवात झाली होती. गोदावरी काठ परिसर, मंदिरे फुलांनी तसेच आकर्षक विद्युत रोषणाईमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. अवघी नाशिक नगरी झेंडे आणि पताकांनी भगवेमय करण्यात आली आहे. यावेळी ध्वजारोहण सोहळ्यासाठी रामकुंडवर ५१ फूट उंचीचा मुख्य धर्मध्वजस्तंभ उभारण्यात आला आहे. यासाठी पंचधातूंचा वापर करण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्त तीर्थावर तब्बल ३१ फूट उंचीचा मुख्य ध्वजस्तंभ उभारला आहे. या स्तंभाला ६२ किलो पितळाचा मुलामा आहे.

दोन्ही ध्वजारोहण सोहळे एकाचवेळी करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नाशिकमधून (रामकुंड) आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्र्यंबकेश्वरमधून (कुशावर्त) उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शंकराचार्यांनी कुशावर्त कुंडात स्थान केले. प्रति कुशावर्त अशी ओळख असलेल्या श्रीचंद्र घाटावरही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुशावर्तावर ध्वजारोहण केल्यानंतर मुख्यमंत्री श्रीचंद्र घाटावर गेले होते.

SPOT NEWS

लातुरात कुरिअर पार्सलचा भिषण स्फोट

● लातूर – लातूरातील उद्योग भवन परिसरात उमाटे इंटरनॅशनल कुरिअरच्या पार्सलमध्ये दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते १०.१५ च्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात २ कर्मचारी जखमी झाले. यातील एक गंभीर आहे. या स्फोटामध्ये पार्सलच्या वाहनाचे छत आणि खालचा भाग फाटला. यावरून स्फोटाची तीव्रता लक्षात येते. या घटनेने लातूरमध्ये खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिस, एटीएस, बीडीडीएस, स्थानिक गुन्हे शाखा आणि फॉरेन्सिक एक्स्पर्टची टिम घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी घटनास्थळाची श्वान पथकाद्वारे आणि मेटल डिटेक्टरच्या सहकायाने पूर्ण परिसराची तपासणी केली. तसेच फॉरेन्सिक एक्स्पर्टच्या टिमने घटनास्थळावरून विविध नमुने घेतले आहेत. गण, गण पावडर आणि छ-यांचा स्फोट झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. नेहमीप्रमाणे उमाटे कुरिअरचे काम शनिवारी सकाळी सुरु झाले. टेम्पोमधून कुरिअरचे पार्सल उतरवले जात असताना हा स्फोट झाल्याची पोलिसांनी माहिती दिली. दरम्यान, या घटनेचा सीसीटीव्ही व्हीडिओ समोर आला आहे. छत्रपती संभाजीनगरहून लातूरला हे पार्सल आले होते. याच पार्सलच्या बॉक्सचा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

नोव्हेंबरच्या पहिल्याच आठवड्यात जमा होणार अग्रिम रक्कम

● मुंबई – राज्यातील १.५ कोटी शेतक-यांसाठी आनंदवार्ता धडकली आहे. ५ हजारांची अग्रिम रक्कम त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. लाभार्थ्यांची यादी सुद्धा धडकली आहे. नुकताच दोन हजारांचा पीएम किसानचा हप्ता जमा झाला. आणि आता अग्रिम रक्कम जमा होणार आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे २ नोव्हेंबरपासून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अग्रिम रक्कम वाटप करण्यास सुरूवात होणार आहे. राज्यातील ३०४ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यातील १.५ कोटी शेतकऱ्यांना ५ हजारांची अग्रिम रक्कम त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. लाभार्थ्यांची यादी सुद्धा तहसील कार्यालयात दाखल झाली आहे. आता अग्रिम रक्कम जमा होणार आहे.

दीपोत्सवासाठी अयोध्या सज्ज; ३३ लाख दिवे, ३५ हजार स्वयंसेवक सहभागी

● अयोध्या । वीरभूमी – नोव्हेंबर महिन्यात दिवाळीचा सण साजरा केला जाणार आहे. दिवाळी सणाच्या तयारीच्या सुरुवातीला वेग आला आहे. दरवर्षी अयोध्येला मोठ्या प्रमाणात दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला जातो. यंदाही उत्साहात दिवाळी साजरी करण्यासाठी अयोध्या सज्ज झाली आहे. शरयू नदीच्या काठावरील ५६ ठिकाणी दिवे लावले जाणार आहेत.

अयोध्येतील दिव्यांच्या उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. शरयू नदीच्या ५६ घाटांवर ३३ लाख दिवे लावले जातील. दिवे, ६६ लाख वाती, ५५ हजार लीटर मोहरीचे तेल, कापूर, मेणबत्त्या आणि इतर साहित्याचा पुरवठा झाला आहे. सर्व साहित्य प्राप्त झाले आहे. दिवे घाटांवर पोहोचवले जात आहेत. सजावटीसाठी निर्धारित आकारात चिन्हांकित करण्याचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. दिवे सजवण्याची आणि प्रज्वलित करण्याची जबाबदारी अंदाजे ३५ हजार स्वयंसेवकांवर असेल. सुरक्षेसाठी सर्व स्वयंसेवकांकरिता हाय-टेक बारकोड असलेली ओळखपत्रे तयार करण्यात आली आहेत. ही ओळखपत्रे ३ नोव्हेंबरनंतर वितरित केली जातील. कार्यक्रमादरम्यान आधार कार्ड आणि विद्यापीठाचे ओळखपत्र सोबत बाळगण्याच्या सूचना दिल्या जातील, अशी माहिती अवध विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बिजेंद्र सिंह यांनी दिली.

दीपोत्सवाचे आयोजन ५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. मुख्य सोहळा ७ नोव्हेंबर रोजी पार पडेल. त्याआधी, राम की पैडी सजवण्याचे आणि सुशोभित करण्याचे काम सुरू आहे. दहा मंडप उभारले जात आहेत. राजस्थानी संस्कृतीवर आधारित एक सेल्फी पॉईंट तयार केला जात आहे. एकूण पाच ते सहा हजार पाहुण्यांसाठी बसण्याची सोय असेल, जी गेल्या वर्षीपेक्षा सुमारे दोन हजारांनी जास्त आहे.

केंद्र सरकारकडून जनगणनेच्या तारखा जाहीर

● नवी दिल्ली । वीरभूमी – जनगणना २०२७ संदर्भात केंद्र सरकारने महत्वाची अपडेट दिली आहे. केंद्र सरकारकडून २०२७ च्या जनगणनेच्या तारखा देशभरात जाहीर करण्यात आल्या आहेत. सरकारने २५ जानेवारी २०२७ ते २८ फेब्रुवारी २०२७ या तारखा निश्चित करून जनगणनेची घोषणा केली आहे. जनगणनेसाठी संदर्भ तारीख १ मार्च २०२७ रोजी मध्यरात्री १२ वाजता निश्चित करण्यात आली आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, बर्फवृष्टी होणारा भाग आणि निवडणुका असलेल्या राज्यांव्यतिरिक्त देशाच्या उर्वरित भागात २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ दरम्यान जनगणना केली जाणार आहे.

अधिकृत अधिसूचनेनुसार, जनगणनेसाठी संदर्भ तारीख १ मार्च २०२७ रोजी मध्यरात्री १२ असेल. या टप्प्यामध्ये बर्फवृष्टी होणाऱ्या आणि निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये जनगणना घेतली जाणार नाही. निवडणुकांमुळे मणिपूर, गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडमध्ये सध्या जनगणना होणार नाही. तर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरमधील बर्फवृष्टी होणा-या भागांमध्ये देखील जनगणना होणार नाही. या भागांसाठीच्या जनगणनेच्या तारखा स्वतंत्रपणे जाहीर केल्या जातील.

भारताचे जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, मणिपूर, गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, लडाख, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरमधील बर्फवृष्टी होणारे भाग वगळता सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २५ जानेवारी २०२७ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत जनगणना होणार आहे. जनगणनेसाठी सरकार ऑनलाइन पोर्टल सुरू करणार आहे. मुख्य जनगणनेच्या कामापूर्वी सरकार नागरिकांना तपशील स्वयं-नोंदणी करण्याची परवानगी देईल, ज्यासाठी ऑनलाइन पोर्टल १० जानेवारी ते २४ जानेवारी २०२७ पर्यंत सुरू राहील. त्यानंतर जनगणनेच्या माहितीची अंतिम जुळवणी आणि दुरुस्ती करण्यासाठी १ मार्च ते ५ मार्च २०२७ दरम्यान एक पुनरावलोकन फेरी आयोजित केली जाईल. गृह मंत्रालयाकडून ही अधिसूचना अशावेळी जारी करण्यात आली आहे जेव्हा काँग्रेस पक्षाने आरोप केला आहे की, केंद्रीय सरकार २०२७ ची जनगणना अशा पद्धतीने घेण्याची तयारी करत आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांविरोधात सार्वजनिक महाभियोग

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंचा हल्लाबोल । इंडिया आघाडीने केले ६ आरोप

● नवी दिल्ली । वीरभूमी – देशातील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष पराकोटीला पोहोचला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी आज आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात सार्वजनिक महाभियोग प्रस्ताव मांडला. या बैठकीत खरगे यांनी ज्ञानेश कुमार यांच्यावर गंभीर आरोप करीत त्यांच्या हकालपट्टीची मागणी केली.

सार्वजनिक महाभियोग कार्यक्रमासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, यूपीएच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील प्रमुख विरोधी पक्षनेते काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार यांनी भूषविले. मुख्य निवडणूक आयुक्तांवरील महाभियोग प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार म्हणाल्या की, लोकांना मतदान करण्यापासून रोखणे हा लोकशाहीवरील हल्ला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार निष्पक्ष नाहीत, असेही त्या म्हणाल्या.

यानंतर खरगे यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांचे काम स्वतंत्र नसून ते सत्ताधा-यांच्या दबावाखाली काम करीत असल्याचा आरोप केला. मुख्य निवडणूक आयोगाविरुद्ध आपल्या मनात कोणताही वैयक्तिक द्वेष नाही, असे त्यांनी सांगितले. त्यांना निष्पक्ष निवडणुका हव्या आहेत, परंतु मुख्य निवडणूक आयोग पंतप्रधानांच्या सांगण्यावरून काम करत आहे, असे ते म्हणाले. आज मतदानाचा हक्क धोक्यात आला आहे, असे काँग्रेस अध्यक्ष खरगे म्हणाले. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आपण आपली सर्व शक्ती पणाला लावू. एसआयआरच्या नावाखाली लोकांची मते रद्द केली जात असल्याचे त्यांनी म्हटले. संविधानाच्या निर्मात्यांनी जात किंवा धर्माच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वांना मतदानाचा हक्क दिला आहे, असे ते म्हणाले.

जर ज्ञानेशकुमार यांना वाटत असेल की मोदी आणि शाह वाचवतील तर देशात काय चालले आहे ते पाहा. लोकांचा मूड काय आहे? मी हमी देतो की रस्त्यावर उतरलेले लोक तुम्ही त्यांच्यासोबत जे केले ते कधीही विसरणार नाहीत. तुम्ही राष्ट्राच्या आत्म्यावर हल्ला केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या महाभियोगावर चर्चा करण्यासाठी संपूर्ण विरोधी पक्षाला बागेत बसावे लागत आहे. कारण इतर सर्व संस्था आमच्यासाठी बंद आहेत, अशा शब्दांत राहुल गांधींनी हल्लाबोल केला.

केंद्रीय निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारच्या कारभाराविरोधात इंडिया आघाडीने व्होट चोरी आंदोलन छेडले आहे. या आंदोलनाचा पुढील टप्पा १ नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर एका मोठ्या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

निवडणूक आयुक्तांवर विरोधकांचे ६ आरोप

- निवडणूक चोरीचा कट
- १३.२ कोटी मतदारांची नावे वगळली
- फॉर्म-६ मध्ये फेरफार
- ईसीआयएनईटीद्वारे मतदार याद्यांवर नियंत्रण
- इतर आयुक्तांकडे दुर्लक्ष
- सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून काम

बैठकीत १९ पक्षांचे २१५ खासदार उपस्थित

■ राजधानी दिल्लीत मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी आयोजित प्रातिनिधिक संसदेचे अधिवेशन ३ तास २३ मिनिटे चालले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव मांडला. त्यांच्यावर ६ आरोप ठेवण्यात आले. हा प्रस्ताव सर्व खासदारांनी मंजूर केला. काँग्रेससह १९ पक्षांचे २१५ खासदार सहभागी झाले होते. हे एक प्रतिकात्मक कृत्य आहे.

SPOT NEWS

अहिल्यानगरमधील 'पारिजात चौक' होणार 'राजर्षी शाहू महाराज चौक'?

● अहिल्यानगर। वीरभूमी–
अहिल्यानगर शहरातील गुलमोहोर रोडवरील पारिजात चौकाचे नामकरण 'पारिजात चौक' करण्याच्या महापालिका प्रशासनाच्या प्रस्तावाला 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज सेवाभावी प्रतिष्ठाण' (ट्रस्ट) वतीने तीव्र हरकत घेण्यात आली आहे. या चौकाचे नामकरण 'राजर्षी शाहू महाराज चौक' करावे, अशी ठाम व सर्वसमावेशक मागणी करण्यात आली असून, यासंदर्भातील निवेदन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांना राजश्री प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने हरकतीचे निवेदन देण्यात आले यावेळी हर्षल बांगर, गोकुळ गोधडे, अनुप सत्राळकर, अजित सिद्दम, साहिल पवार, अजिक्य शिंदे, गजेंद्र गोधडे, मनोज गोधडे, श्रीकांत भालके, आदित्य खाकाळ आदीसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजर्षी प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, गेल्या पंचवीस वर्षांपासून या प्रतिष्ठानाच्या माध्यमातून पारिजात चौक परिसरात विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. यामध्ये गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव, राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव तसेच विविध महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गेल्या २५ वर्षांपासून या परिसरात सामाजिक सलोखा, महापुरुषांचे विचार आणि जनजागृती करण्याचे कार्य अविरत सुरू असल्याने, या चौकाला राजर्षी शाहू महाराजांचे नाव देणे हा त्यांच्या विचारांचा व सामाजिक कार्याचा खरा सन्मान ठरेल, असे प्रतिपादन प्रतिष्ठानने केले आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण, सामाजिक समता, आरक्षण, बहुजनांचे उत्थान आणि सामाजिक न्यायासाठी समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्दिष्टानेच पारिजात चौकास 'राजर्षी शाहू महाराज चौक' असे अधिकृत नामकरण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तरी महानगरपालिका प्रशासनाने महासभेत ठेवलेल्या नामकरणाच्या विषयाचा पुनर्विचार करावा, प्रतिष्ठानच्या २५ वर्षांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची दखल घ्यावी आणि पारिजात चौकास 'राजर्षी शाहू महाराज चौक' असा अधिकृत नामकरणाचा ठराव मंजूर करावा, अशी मागणी राजर्षी प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे.

वनहक्क दाव्यांच्या निपटाऱ्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत विशेष मोहीम

● अहिल्यानगर। वीरभूमी–
वनहक्क अधिनियम २००६ अंतर्गत प्रलंबित वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी आणि नामंजूर दाव्यांची फेरतपासणी करण्यासाठी राज्य शासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे. महसूल विभागाच्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार ही मोहीम १५ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाइन व भारतीय जनसंसदेने दिली. या मोहिमेत ग्राम, उपविभागीय आणि जिल्हास्तरीय समित्यांकडे प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. यापूर्वी नामंजूर झालेल्या दावेदारांना नामंजुरीची कारणे समजावून अतिरिक्त पुरावे व म्हणणे सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. त्यानंतर पात्रतेनुसार निर्णय घेण्यात येणार आहेत. वनहक्कासाठी अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी यांचे पात्रता निकष वेगवेगळे आहेत. इतर पारंपरिक वननिवासींना १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान तीन पिढ्यांचा वननिवास आणि वनावर उपजीविकेसाठी अवलंबित्व सिद्ध करावे लागते. मात्र, ७५ वर्षांची अट अनुसूचित जमातींच्या दाव्यांना लागू होत नाही. दावा केलेल्या जमिनीवरील ताबाही १३ डिसेंबर २००५ पूर्वीचा असणे आवश्यक आहे. दावेदारांनी आपला अर्ज कोणत्या समितीकडे प्रलंबित आहे, याची माहिती घेऊन अर्जाची पोच, दावा क्रमांक, ग्रामसभेचा ठराव, जुने वन व महसूल अभिलेख, नकाशे आणि इतर उपलब्ध पुरावे सुरक्षित ठेवावेत.

गौतम पब्लिक स्कूलची क्रीडा क्षेत्रात दमदार कामगिरी

व्हॉलीबॉलमध्ये राज्य उपविजेतेपद तर हॉकीत दुहेरी मुकुट । कल्याणी वावधनेची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड

● कोपरगाव। वीरभूमी –
गौतम पब्लिक स्कूलने यंदाच्या शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करत क्रीडा क्षेत्रातील आपला लौकिक अधिक उंचावला आहे. चिपळूण येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत पुणे विभागाच्या मुलींच्या संघाने उपविजेतेपद पटकावले, तर शाळेच्या १४ व १७ वर्षांखालील दोन्ही मुलांच्या हॉकी संघांनी विभागीय स्पर्धेत विजेतेपद मिळवत दुहेरी मुकुटावर नाव कोरले. विशेष म्हणजे, व्हॉलीबॉल संघातील कु. कल्याणी वावधने हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली असून, दोन्ही हॉकी संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. अशी माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली.

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी तसेच रत्नागिरी जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२६-२७ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पुणे विभागाच्या मुलींच्या संघाने पहिल्याच सामन्यात मुंबई विभागाचा ३-० असा सरळ सेटमध्ये पराभव करत शानदार सुरुवात केली. उपांत्य फेरीत नागपूर विभागाविरुद्ध पाच सेटपर्यंत रंगलेल्या चुरशीच्या लढतीत विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यातही संघाने प्रतिस्पर्ध्याला कडवी झुंज दिली; मात्र पुणे विभागाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या संघाचे नेतृत्व गौतम पब्लिक स्कूलच्या खेळाडूने केले. संघातील कु. कल्याणी वावधने हिची शिर्डी येथे दि. २३ ते २७ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे.

दरम्यान, दि. २८ व २९ ऑक्टोबर रोजी गौतम पब्लिक स्कूलच्या क्रीडांगणावर झालेल्या विभागीय शालेय हॉकी स्पर्धेत शाळेच्या दोन्ही संघांनी निर्विवाद वर्चस्व गाजवले. १४ वर्षांखालील गटाच्या अंतिम सामन्यात सोलापूर संघाचा ५-० गोलने, तर १७ वर्षांखालील गटात पुणे शहराच्या संघाचा ७-१ गोलने पराभव करत दोन्ही गटांत विजेतेपद मिळवले. या विजयासह दोन्ही संघांची बुलढाणा येथे दि. १२ ते १५ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेसाठी निवड झाली असून, ते पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे चेअरमन मा.आ.अशोकराव काळे, विश्वस्त आमदार आशुतोष काळे, सचिव सौ. चैतालीताई काळे, संस्था इन्स्पेक्टर नारायण बारे, सर्व संस्था सदस्य आणि प्राचार्य नूर शेख यांनी खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना प्राचार्य नूर शेख, फिजिकल डायरेक्टर रमेश पटारे, व्हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र आढाव, इशाक सय्यद, महेश गोंडे, सर्व हाऊस मास्टर्स आणि पर्यवेक्षिका ज्योती शेलार यांचे मार्गदर्शन लाभले.

हॉकी व व्हॉलीबॉलसह क्रिकेट, फुटबॉल आणि कुस्ती या खेळांमध्येही गौतम पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यंदा उल्लेखनीय यश मिळवले आहे. सातत्यपूर्ण सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि संस्थेच्या प्रोत्साहनातून शाळेने क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकवर्गात आनंदाचे वातावरण असून, राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत दोन्ही संघांकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत आहे.

> गौतम पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मिळविलेले उपविजेतेपद, तर हॉकीमध्ये दोन्ही गटांत विभागीय विजेतेपद मिळवून शाळेच्या क्रीडा परंपरेचा गौरव वाढविला आहे. गौतमच्या कल्याणी वावधनेची राष्ट्रीय स्पर्धे साठी महाराष्ट्राच्या संघात झालेली निवड ही संपूर्ण गौतम परिवारासाठी अभिमानाची बाब आहे. खेळाडूंची जिद्द, प्रशिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि संस्थेचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन यामुळेच हे यश साध्य झाले आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरही गौतमचे खेळाडू यापुढेही अशीच उज्ज्वल कामगिरी करून गौतमचा आणि परिसराचा नावलौकिक वाढवत राहतील असा विश्वास आहे.
>
> **– सौ. चैतालीताई काळे**

लिंगदेव शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

जर्मनीत कार्यरत होलगीर दाम्पत्याचा सामाजिक उपक्रम

● अकोले। वीरभूमी –
लिंगदेव (फापाळेवाडी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना पाट्या, वह्या व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. जर्मनी येथे कार्यरत असलेले लिंगदेवचे भूमिपुत्र राजेंद्र रामभाऊ होलगीर यांच्या पत्नी सुनीता होलगीर यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

परदेशात कार्यरत असतानाही आपल्या गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योगदान देण्याच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब गोडसे, भीमाशंकर हांडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित फापाळे, अशोक फापाळे, संदीप फापाळे व पालक उपस्थित होते.

या उपक्रमाबद्दल भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे आणि ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे यांनी होलगीर दाम्पत्याचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

पारनेरमध्ये रा. स्व. संघाचे शस्त्रपूजन व भव्य पथसंचलन

विजयादशमी उत्सवानिमित्त आयोजन । जिल्हा प्रचारक दीपक पारेकर यांचे मार्गदर्शन

● पारनेर। वीरभूमी–
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पारनेर तालुक्याच्या वतीने विजयादशमी उत्सवानिमित्त शनिवारी (दि. ३१ ऑक्टोबर) पारनेर शहरात शस्त्रपूजन आणि भव्य पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते .या उत्सवात तालुक्यातील स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेशात सहभाग नोंदविला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा प्रचारक दीपक पारेकर यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कीर्तनकार व सामाजिक कार्यकर्ते ह.भ.प. सचिन महाराज शेटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.शहरातील नागेश्वर मंदिर प्रांगणात सकाळी ९.२० वाजता स्वयंसेवकांचे एकत्रीकरण झाले. त्यानंतर सकाळी १० वाजता शस्त्रपूजन करून पथसंचलनाला प्रारंभ करण्यात आला. शिस्तबद्ध रचनेत आणि पूर्ण गणवेशात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांच्या संचलनामुळे शहरातील वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. विविध भागांतून मार्गक्रमण करताना नागरिकांनीही संचलन पाहण्यासाठी उपस्थिती लावली.

नागेश्वर मंदिर प्रांगणातून सुरू झालेल्या पथसंचलनाने डॉ. पठारे हॉस्पिटल चौक, खालची वेस, हनुमान मंदिर, मुख्य बाजारपेठ, भैरवनाथ मंदिर, कोमल किराणा स्टोअर्स, पारनेर न्यायालय, तहसील कार्यालय रोड आणि हिंद चौक या मार्गावरून मार्गक्रमण केले. त्यानंतर नागेश्वर कमानीतून संचलन पुन्हा नागेश्वर मंदिर प्रांगणात दाखल झाले. येथे पथसंचलनाची सांगता झाली.

विजयादशमी हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने महत्त्वाचा उत्सव मानला जातो. या निमित्ताने शस्त्रपूजन, स्वयंसेवकांचे एकत्रीकरण आणि पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी संघटित सहभाग नोंदविला. जिल्हा प्रचारक दीपक पारेकर यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित स्वयंसेवकांना विचारांचे मार्गदर्शन लाभले. या विजयादशमी उत्सवात पारनेर तालुक्यातील स्वयंसेवकांसह नागरिकांनी सहभाग घेतला. नागेश्वर मंदिर प्रांगणात सुरू झालेल्या या कार्यक्रमाची पथसंचलनानंतर सांगता झाली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

पुणेकरांच्या दातृत्वातून आदिवासी विद्यार्थ्यांची दिवाळी गोड!

पिंपळदरी परिसरातील विविध शाळांमध्ये दिवाळी फराळाचे वाटप । पुण्यातील सामाजिक व व्यावसायिक संस्थांचा स्तुत्य उपक्रम

● अकोले। वीरभूमी–
दिवाळीचा आनंद गरजूंच्या आयुष्यातही फुलावा, या सामाजिक बांधिलकीतून पुणे येथील विविध सामाजिक व व्यावसायिक संस्थांनी अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची दिवाळी गोड केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने पिंपळदरी परिसरातील विविध शाळांमध्ये दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडेवाडी, चांदसूरज, वेलदरी, वांगदरी, खंडोबाचीवाडी येथील आणि जांभळदरा येथील विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. मुख्य कार्यक्रम कर्मवीर भाऊराव पाटील आश्रमशाळा, पिंपळदरी येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनंजय मलाव होते. यावेळी रविभाऊ आळणे, किशोर थोरात, अमित कोकणे, बाळासाहेब मोरे, भगवान वायकर, दीपक वाकचौरे, रामदास भोजने आणि बाळासाहेब शेळके आदी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी पुणेस्थित सामाजिक कल्याण व मानव संरक्षण संघ, कुलस्वामिनी असोसिएट, समर्थ शैक्षणिक संस्था, अथर्व वॉटर टेक सोल्युशन, अमुकेट प्रोडक्ट, कॉर्नफ्लुएन्स टेक्नॉलॉजी, राशी डिजिटल मार्केटिंग, गणेश कृषी सेवा केंद्र, शनिप्रसाद ट्रान्सपोर्ट आणि वृंदावन मिसळ या संस्थांनी आर्थिक सहकार्य केले. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या या संस्थांनी सामाजिक उत्तरदायित्व जपत गरजू विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभाग नोंदविला.

दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसोबतच त्यांच्या भावविश्वाचाही विचार व्हावा, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. फराळाचे वाटप होताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. फराळाच्या गोडव्याबरोबरच आपुलकी आणि माणुसकीचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. शहरी भागातील दानशूर संस्था आणि ग्रामीण भागातील शाळांमध्ये निर्माण झालेले हे स्नेहबंध समाजासाठी प्रेरणादायी ठरले.

कु. अथर्व रवींद्र आळणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील शेळके यांनी केले, तर अशोक कोरके यांनी आभार मानले.

> **विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच समाधान!**
>
> ■ दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या भावनेतून विविध स्वयंसेवी संस्था आणि दानशूर व्यक्तींशी संपर्क साधला. या आवाहनाला पुण्यातील सामाजिक व व्यावसायिक संस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत आर्थिक सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुललेला आनंद हेच या प्रयत्नांचे खरे समाधान आहे.
>
> **– सुनील शेळके,** शिक्षक, कर्मवीर भाऊराव पाटील आश्रमशाळा, पिंपळदरी

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

समाजभूषण पुरस्कारप्राप्त समाजसेवकांना १५ हजार मानधन देण्याची मागणी

● अहिल्यानगर । वीरभूमी –

महाराष्ट्र शासनाच्या विविध सामाजिक पुरस्कारांनी सन्मानित समाजसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन, तसेच एसटी बसमधून विनामूल्य प्रवासाची सुविधा द्यावी, या मागण्यांसाठी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. राज्याध्यक्ष नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. समाजभूषण, संत रोहिदास, भगवान बिरसा मुंडा यांसह विविध शासकीय पुरस्कारप्राप्त समाजसेवकांनी आयुष्याची ५० ते ६० वर्षे समाजकार्यासाठी खर्च केली आहेत. मात्र, वृद्धापकाळात त्यांना आर्थिक आधार नसल्याने दरमहा १५ हजार रुपये पेन्शन द्यावी. संबंधित पुरस्कारप्राप्त व्यक्तीचे निधन झाल्यास हे मानधन त्यांच्या पत्नीला मिळावे, अशी मागणी महासंघाने केली आहे. तसेच पुरस्कारप्राप्त व्यक्ती आणि त्यांच्या एका साथीदाराला सर्व प्रकारच्या एसटी बसमधून मोफत प्रवासाची सुविधा द्यावी, अशीही मागणी आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी अहिल्यानगर तालुक्यातील वडगाव गुप्ता येथे दहा एकर जागा उपलब्ध करून देण्याचा प्रश्नही आंदोलनातून उपस्थित करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीने जागेसाठी ना-हरकत दाखला दिला असून, महसूल विभागाच्या तांत्रिक अहवालातही जागा महसूल विभागाची असल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा महासंघाने केला आहे. मात्र, संबंधित २२५ हेक्टर जमीन एमआयडीसीच्या विस्तारीकरणासाठी विनामूल्य वर्ग करण्याचा शासन निर्णय झाल्याने स्मारकाचा प्रश्न प्रलंबित असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. या प्रकरणाची कायदेशीर तपासणी करून स्मारकासाठी प्रस्तावित जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. समाजसेवकांना आर्थिक सुरक्षा आणि अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. या उपोषणात नामदेवराव चांदणे यांच्यासह काशिनाथ सुलाखे, संजय चांदणे, कडू बाबा लोंढे, विश्वनाथ अल्हाट, ना. म. साठे, भगवानराव जगताप, दिलीप सोळसे, अशोक भोसले, सुनील सकट, पोपटराव साठे, पोपटराव पाथरे, दत्ता विधावे, बापू कसबे, राधेलाल नाकवाल, हिराबाई गोरखे, निलेश चांदणे, राजू पवार आदी सहभागी झाले आहेत.

चंद्रकला रेवगडे यांचे निधन

● अकोले । वीरभूमी –

तालुक्यातील हिवरगाव आंबरे येथील सौ. चंद्रकला

(ताई) दशरथ रेवगडे यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पच्छात पती, दोन मुलं, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दशरथ रभाजी रेवगडे यांच्या पत्नी तर स्वप्नील आणि बाबु रेवगडे यांच्या त्या मोतीश्री होत. त्यांच्या पार्थिवावर हिवरगाव आंबरे येथे आढळातीरी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

भोयरे-गांगर्डात ढगफुटीसदृश पाऊस

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा । नदी-नाले तुडुंब भरले, पिकांना जीवदान

● पारनेर । वीरभूमी–

पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा परिसरात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. ३०) रात्री ११.४५ वाजल्यापासून शनिवार (दि. ३१) सकाळी ७.३० वाजेपर्यंत मुसळधार पाऊस झाला. जवळपास सात ते आठ तास सुरू असलेल्या या पावसामुळे परिसरातील ओढे-नाले वाहू लागले असून, शेतांमध्ये पाणी साचून तळ्याचे स्वरूप निर्माण झाले होते. या पावसामुळे पाण्याअभावी कोमेजून चाललेल्या पिकांना जीवदान मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भोयरे-गांगर्डा परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तर कडूस, रूईछत्रपती, बाबुर्डी, आपधूप, वाळवणे, सुपा, पिंपरी गवळी आणि रांजणगाव मशीद परिसरात शुक्रवारी रात्री ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. अनेक दिवसांपासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे. तालुक्यात दुष्काळी परिस्थितीमुळे ज्वारी, मका, कांदा आणि तूर या पिकांची वाढ खुंटली होती. पाण्याअभावी पिके जळून जाण्याच्या मार्गावर असताना झालेल्या पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला आहे. त्यामुळे पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा शेतकऱ्यांना वाटू लागली आहे. मात्र, रब्बी हंगामासाठी पुरेसा पाऊस होणे आवश्यक असल्याने शेतकरी अद्याप मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पारनेर तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, जनावरांच्या चाऱ्याची समस्याही भेडसावत आहे. केटी बंधारे, बोअरवेल, विहिरी आणि तलाव कोरडे पडल्याने पाणीटंचाई अधिक तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत भोयरे-गांगर्डा परिसरात झालेल्या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा काहीशा पल्लवित झाल्या आहेत. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी पाणीटंचाईचे संकट पूर्णपणे दूर होण्यासाठी आणखी दमदार पावसाची गरज आहे. हवामान खात्याने पुढील दोन ते तीन दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तविल्याने शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले आहे.

गोळाफेकमध्ये ‘युगंधर’ला रौप्य, थाळीफेकमध्ये कांस्यपदक!

देवदैठणच्या खेळाडूची चमकदार कामगिरी; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

● श्रीगोंदा । वीरभूमी –

पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत देवदैठण येथील युगंधर गणेश वाघमारे याने दुहेरी पदकांची कमाई करत उल्लेखनीय यश संपादन केले. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात गोळाफेकमध्ये रौप्यपदक, तर थाळीफेकमध्ये कांस्यपदक पटकावत त्याने गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. गोळाफेक प्रकारात त्याची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.

दि. ३० ऑक्टोबर रोजी पिंपरी-चिंचवड येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलात या स्पर्धा पार पडल्या. पुणे, सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यांसह संबंधित शहरांतील खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत युगंधरने दमदार कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

युगंधरला त्याचे वडील राष्ट्रीय खेळाडू पैलवान गणेश वाघमारे आणि आजोबा पैलवान नामदेव वाघमारे सर यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा क्षेत्राचा वारसा, नियमित सराव आणि मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश मिळविले.

त्याच्या या यशाबद्दल देवदैठण परिसरातून अभिनंदन होत असून, राज्यस्तरीय स्पर्धेतील कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत संजीवनी सैनिकी स्कूलचा ‘राष्ट्रीय नाद’ घुमणार!

‘एकता परेड-२०२६’ मध्ये ब्रास बँड पथकाचे सादरीकरण

● कोपरगाव । वीरभूमी–

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आज, ३१ ऑक्टोबर रोजी गुजरातमधील एकतानगर येथे होणाऱ्या ‘एकता परेड-२०२६’ मध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे ब्रास बँड पथक आपल्या सुरेल व शिस्तबद्ध वादनाने राष्ट्रीय मंचावर महाराष्ट्राचा गौरव वाढविणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या दिमाखदार सोहळ्यात सादरीकरण करण्याचा बहुमान विध्यार्थ्यांना मिळाला असून, त्यांच्या वादनातून संजीवनीचा ‘राष्ट्रीय नाद’ घुमणार आहे.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने ९ सप्टेंबर २०२६ रोजी पाठविलेल्या अधिकृत पत्रानुसार, संजीवनीच्या ब्रास बँड पथकाची ‘स्कूल बँड डिस्प्ले’मधील ‘बॉईज ब्रास बँड’ श्रेणीसाठी निवड झाली. त्यानुसार २१ ऑक्टोबरपासून एकतानगर येथे देशभरातील निवडक शालेय बँड पथकांसोबत संयुक्त सराव सुरू झाला. गेल्या दहा दिवसांपासून भारतीय लष्कराच्या पथकांसह सराव करताना संजीवनीच्या विद्याथ्र्यांनी वादनातील अचूकता, संचलनातील शिस्त, ताल-लय आणि सांघिक समन्वय यांचा उत्कृष्ट प्रत्यय दिला आहे.

दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेत देशात प्रथम क्रमांक पटकावल्यानंतर मिळालेली ही संधी विध्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि गुणवत्तेवर राष्ट्रीय स्तरावर उमटलेली मोहोर आहे. प्रत्येक सूर, ठेका आणि संचलनातील पाऊल अचूक साधण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले. राष्ट्रीय स्तरावरील संयुक्त सरावातही त्यांनी आत्मविश्वास आणि शिस्तीचे दर्शन घडविले.

संस्थेचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे आणि मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून आजच्या सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विश्वस्त श्री सुमित कोल्हे हे विध्यार्थ्यांसोबत एकतानगर येथे उपस्थित आहेत.

या यशस्वी वाटचालीत विश्वस्त श्री सुमित कोल्हे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन, संगीत शिक्षक महेश गुरव यांचे प्रशिक्षण, कल्चरल हेड शुभम जाधव यांचे नियोजन, कॅम्पस को-ऑर्डिनेटर विजय भास्कर यांचे समन्वय आणि प्राचार्य कैलास दरेकर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. बँड प्रशिक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही योगदान महत्त्वपूर्ण आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही योग्य प्रशिक्षण, संधी आणि जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करता येते, हे संजीवनीच्या पथकाने दाखवून दिले आहे. आजचे सादरीकरण म्हणजे केवळ वादन नव्हे, तर शिस्त, मेहनत, सांघिक भावना आणि राष्ट्रप्रेमाचा गौरवपूर्ण आविष्कार ठरणार आहे. कोपरगावसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही निश्चितच अभिमानास्पद कामगिरी आहे.

चापडगाव हायस्कूलमध्ये पर्यावरणपूरक आकाशकंदील, पणती रंगकाम कार्यशाळा उत्साहात

‘आनंददायी शनिवार’ उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; स्वनिर्मितीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

● पाथर्डी । वीरभूमी–

चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चापडगाव येथे ‘आनंददायी शनिवार’ उपक्रमांतर्गत इको-फ्रेंडली आकाशकंदील निर्मिती व पणती रंगवा कार्यशाळेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला, कल्पकतेला आणि सृजनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यशाळेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध रंगांचे आकर्षक कागद, पर्यावरणपूरक साहित्य आणि कल्पकतेचा सुंदर संगम साधत विद्यार्थ्यांनी मनमोहक आकाशकंदील तयार केले. तसेच साध्या पणत्यांना विविध रंगांनी सजवून त्यांना आकर्षक स्वरूप दिले. स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या कलाकृतींमधून विद्यार्थ्यांनी सृजनशीलतेचा आनंद अनुभवला. त्यांच्या कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यशाळेचे मार्गदर्शन विद्यालयाचे कलाशिक्षक कल्याण राऊत सर यांनी केले. विद्यार्थ्यांना आकाशकंदील निर्मिती व पणती रंगकामाच्या विविध कलात्मक पद्धतींची माहिती देऊन त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. संपतराव दसपुते सर होते. आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. बाजारातील महागडे व प्रदूषणास कारणीभूत ठरणारे प्लॅस्टिक किंवा थर्माकोलचे आकाशकंदील खरेदी करण्याऐवजी घरच्या घरी कमी खर्चात, पर्यावरणपूरक साहित्य वापरून आकाशकंदील तयार करावेत. यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होण्याबरोबरच स्वनिर्मितीचा आनंदही मिळतो, असे त्यांनी सांगितले.

तसेच विद्यार्थ्यांनी शाळेत तयार केलेले आकाशकंदील आणि रंगवलेल्या पणत्या दिवाळीच्या काळात आपल्या घराच्या अंगणात व परिसरात लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या उपक्रमासाठी विद्यालयाचे उपप्राचार्य सुनील जायभाये, ज्ञानेश्वर तहकीक, सुरेंद्र लोहकरे, सर्जेराव निकाळजे, प्रभाकर मराठे, अशोक आघवणे, संपदा गायके, दत्तात्रेय रणदिवे, राघवी जोशी, अनघा बोडखे व धनश्री धट यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करून मोलाचे सहकार्य केले.

विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक अभिव्यक्ती, स्वावलंबन, पर्यावरणाविषयी जागरूकता आणि आनंददायी शिक्षणाची भावना निर्माण करणारा हा उपक्रम सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

‘स्वनिर्मितीचा आनंद घेऊया, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करूया!’ हा संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

पाथर्डी तालुक्यात गळक्या टँकरमुळे पाण्याचा अपव्यय

प्रशासनाकडून ठेकेदाराला नोटीस | मंजूर क्षमतेपेक्षा कमी पाणी मिळत असल्याच्या तक्रारी

● पाथर्डी | वीरभूमी – जिल्ह्यात सर्वाधिक पाणीटंचाई असलेल्या तालुक्यांमध्ये पाथर्डीचा समावेश होतो. तालुक्यातील ७५ गावे आणि ४४३ वाड्यांना सध्या ९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र, जुन्या व गळक्या टँकरमुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असून, लाभार्थ्यांना मंजूर क्षमतेनुसार पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी तहसीलदारांकडे केल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांनी टँकर पुरवठादार संस्थेला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

तालुक्यात दिवसेंदिवस पाणीटंचाईची तीव्रता वाढत आहे. पाण्याच्या उद्भवांवरही टँकरच्या रांगा लागत असून, शेवगाव तालुक्यातील राक्षी येथून बहुतांश गावांना पाणीपुरवठा केला जात आहे. दररोज १९१ खेपा होत असल्या तरी गळक्या टँकरमुळे अत्यंत मौल्यवान असलेले पाणी टंचाईग्रस्तांपर्यंत मंजूरक्षमतेनुसार पोहोचत नाही. कागदावरील आकडे व लाभार्थ्यांना मिळणारे प्रत्यक्ष पाणी यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली असून दैनंदिन वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. गावोगावच्या लोकांकडून टँकर चालकाबरोबर कुरबुरी वाढल्या आहेत. त्यातच मुख्य गावा ऐवजी वस्त्यांवर जाऊन पाणी वाटप करावे लागत असल्याने वाटपाचे नियोजन अत्यंत त्रासदायक झाले आहे. बऱ्याच टँकरवर जुनाट गळक्या टाक्या असून चढणीच्या रस्त्याला तर पाण्याचा दबाव मागील बाजूने वाढून प्रेशर पंपाने पाणी बाहेर टाकल्यासारख्या पद्धतीने टँकर मधून पाणी वेगाने गळते. सरळ धावत असताना फुटलेल्या टँकरमधून पाण्याची मोठी धार चालू असते. माणिकदौंडी परिसरात तर टँकरचा आवाज ऐकून लहान मुले गावामध्ये संथ गतीने येणाऱ्या टँकरच्या मागे रिकामी बादल्या घेऊन धावतात. गळतीचे पाणी जरी आपल्याला मिळाले तर तेवढेच बादलीभर पाणी मिळेल, अशा अपेक्षेने जीवाच्या

आकांताने मुले पळत असतात. टँकर कधी येईल याचा नेम नसल्याने कामधंद्याला जाण्याऐवजी टँकर येऊन गेल्यानंतर कामापुरते जेमतेम पाणी मिळवत त्यानंतर संबंधित गावातील लाभार्थी उद्योगधंदे बघतात. दिवाळीचा सण तोंडावर आला असूनही कोठेही तालुक्यात सणाचे वातावरण नाही. महागाईचा भडका उडाला आहे. प्यायला पाणी नाही. जनावराला चारा नाही. हाताला काम नाही. घरात धान्य नाही. सण करायचा तर तो कशाच्या जीवावर? असा प्रश्न सर्वसामान्य लोकांना पडला आहे. दिवाळीनंतर जगायचे कसे? या प्रश्नाने लोकांची झोप उडवली आहे. पाणीपुरवठ्याच्या बाबतीत प्रशासनाची हतबलता लपून राहत नाही.

आमदार मोनिका राजळे यांनी सुद्धा गळक्या टँकर बाबत गांभीर्याने लक्ष घालण्याचे आदेश स्थानिक प्रशासनाला दिले. तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांच्या सूचनेनुसार गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांनी टँकर पुरवठादार संस्थेला नोटीस जारी करत विविध मुद्द्यांवर खुलासा मागितला आहे. या नोटिशीमध्ये म्हटले आहे की, टँकर मधून पाण्याची गळती होत असल्याने संबंधित गावांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा होत नाही. गावातील काही नागरिकांना पुरेशा पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. टँकर भरल्यानंतर टँकरचे टाकीचे झाकण व्यवस्थित बंद न करता उघडे ठेवून वाहतूक केली जात असल्याने पाण्याची गळती वाढली आहे. याशिवाय काही टँकर पूर्ण क्षमतेने न भरता अर्धवट भरून गावांमध्ये आणले जात असल्याचेही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पाणीपुरवठा करण्याच्या कामात गंभीर स्वरूपाचा हलगर्जीपणा, निष्काळजीपणा दर्शविला जात असल्याने टँकर गळती होत नसल्याची खात्री करून आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी. टँकरमध्ये पाणी भरल्यानंतर झाकण व्यवस्थित बंद करूनच वाहतूक करावी. प्रत्येक टँकर संबंधित गावासाठी मंजूर असलेल्या क्षमतेनुसार पूर्ण भरूनच पाणीपुरवठा करावा. वाहतुकी दरम्यान पाण्याची कोणत्याही प्रकारे गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी. या त्रुटींची तात्काळ पूर्तता करून सर्व टँकर सुस्थितीत असल्याबाबत खात्री करावी. प्राप्त तक्रारीनुसार संस्थेमार्फत अशा प्रकारचा निष्काळजीपणा का करण्यात आला, याबाबत लेखी खुलासा तातडीने सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

भिंगारमध्ये हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल जयंती उत्साहात

● अहिल्यानगर | वीरभूमी– देशाचे पहिले उपपंतप्रधान व भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त भिंगार येथे हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि एकता रॅलीतील सहभागातून ग्रुपच्या सदस्यांनी राष्ट्रीय एकात्मतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. वाढते तापमान, पाणीटंचाई आणि दुष्काळाचे संकट लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करावे, पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या राष्ट्रएकात्मतेच्या कार्याचे स्मरण करून उपस्थितांनी राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प केला. यानंतर उद्योजक लॉरेन्स स्वामी व भिंगार छावणी परिषदेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक गणेश भोर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

तसेच परिसरात स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ व सुंदर ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी एकता रॅलीत सहभागी होत राष्ट्रीय एकात्मता, झाडे लावा, पर्यावरण वाचवा आणि पाणी बचतीचा संदेश दिला. या उपक्रमासाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, जहीर सय्यद, ताराचंद टोकळ, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, दिलीप ठोकळ, योगेश चौधरी, सुंदरराव पाटील, सखाराम अळकुटे, निजाम पठाण, अभिजीत सपकाळ, विकास भिंगारदिवे, संतोष लुनिया, छावणी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड, कार्यालयीन अधीक्षक सुनील शिंदे, मुख्याध्यापक संजय शिंदे, राजेंद्र भोसले, भारुड सर, दिलीपराव पालवे, रतन मेहेत्रे, जोगिंदरसिंग, उमाशंकरसिंग पंडित, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, सुभाष पेंढुरकर, दीपक घोडके, रामनाथ गर्जे, देविदास गंडाळ, कांता वाघुळे, वामन पगारे, महादेव साबळे, बाळासाहेब सूर्यवंशी, विशाल भामरे, बाळासाहेब झिंजे आदी उपस्थित होते.

हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील विविध संस्थानांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मतेचा भक्कम पाया घातला. त्यांच्या कार्यातून एकजूट, शिस्त आणि देशहितासाठी काम करण्याची प्रेरणा मिळते. त्याच विचारातून समाजातील प्रत्येक घटकाने एकत्र येऊन सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे गरजेचे आहे. आज पर्यावरणाचा समतोल बिघडत असून पाणीटंचाई आणि दुष्काळाचे संकट गंभीर होत आहे. त्यामुळे प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे स्पष्ट केले.

सचिन चोपडा म्हणाले की, पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असून त्याचा अपव्यय थांबविणे ही काळाची गरज आहे. पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत मुरविणे, वृक्षलागवड करणे आणि लावलेल्या झाडांचे संगोपन करणे या गोष्टी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविल्या पाहिजेत. दुष्काळमुक्त समाज निर्माण करायचा असेल तर शासनाच्या प्रयत्नांबरोबरच नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

आकाशकंदिलातून विद्यार्थ्यांनी दिला बचतीचा मंत्र!

निघोजच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी तासाभरात बनविले दीडशे आकाशकंदील

● निघोज | वीरभूमी– दुष्काळी परिस्थितीत दिवाळीचा सण साजरा करताना अनावश्यक खर्च टाळून पैशांची बचत करण्याचा संदेश निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांनी अवघ्या एका तासात सुमारे दीडशे आकर्षक आकाशकंदील तयार करून पालकांचे हजारो रुपये वाचविले आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

राज्यात सुपर अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे अत्यल्प प्रमाण आणि भरपावसाळ्यात निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई यामुळे दुष्काळाचे संकट गडद झाले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी माणसांचीच धावपळ होत असताना जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे सण साजरे करताना खर्चाला फाटा देऊन बचतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

बाजारात साधा आकाशकंदील खरेदी करण्यासाठी किमान ५०० रुपये खर्च येतो. मात्र, विद्यार्थ्यांनी अवघ्या पाच-पन्नास रुपयांच्या कागदाचा वापर करून आकर्षक आकाशकंदील तयार केले. एका तासात दीडशे कंदील बनवून त्यांनी कमी खर्चात सणाचा आनंद द्विगुणित करण्याचा आदर्श घालून दिला. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक देठे सर, ज्येष्ठ शिक्षक शिंदे सर, साबळे सर, ज्येष्ठ शिक्षिका लंके मॅडम आणि शिक्षिका बेलोटे मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाशकंदिलांचा व्हिडिओ शिक्षकांनी सुंदर गाण्याची जोड देऊन शाळेच्या व्हॉट्सप ग्रुपवर पाठविला.

पालक आणि शाळेच्या हितचिंतकांनी हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केला. अवघ्या तासाभरात हजारो लोकांनी व्हिडिओला पसंती देत विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

गुणवत्तापूर्ण शिक्षणातून शाळेचा नावलौकिक

■ निघोजच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मराठी, इंग्रजीसह विविध विषयांचे शिक्षण देणारे द्विपदवीधर शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख उंचावला आहे. यंदा शाळेत सर्वाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून निघोज पंचक्रोशीतील एक सुंदर शाळा म्हणून तिचा नावलौकिक झाला आहे. विविध सामाजिक उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव आणि सामाजिक जाणीव रुजविली जात आहे. शाळेला राज्य सरकारचा उत्कृष्ट शाळा पुरस्कारही मिळाला आहे.

– रोहन उनवणे, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती.

दिव्यांग, अनाथ विद्यार्थ्यांसोबत संत वामनभाऊ मित्र मंडळाची दिवाळी

निवासी मतिमंद विद्यालयात फराळ वाटप व स्नेहभोजन | दुष्काळग्रस्तांना मदतीचे हाजी हुमायूनभाई आतार यांचे आवाहन

● पाथर्डी | वीरभूमी– तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यंदा दिवाळी साधेपणाने साजरी करून उपेक्षित, गरीब, दिव्यांग आणि असहाय घटकांना मदत करावी. गरजूंच्या जीवनात आनंदाचा प्रकाश निर्माण करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे मत दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष हाजी हुमायूनभाई आतार यांनी व्यक्त केले.

संत वामनभाऊ तरुण मंडळ आणि बालाजी उद्योग समूहाचे संतोष गायकवाड मित्र मंडळ यांच्या वतीने निवासी मतिमंद विद्यालय व मतिमंद मुलांच्या बालगृहात फराळ वाटप आणि दिवाळी स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आतार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री होते.

या संस्थेत सुमारे २०० अनाथ व मतिमंद विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रांतील निमंत्रित मान्यवरांसाठी स्नेहभोजन आयोजित करण्यात आले. मंडळाच्या उपक्रमांत सक्रिय सहभाग देणाऱ्या मान्यवरांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. राज्य शासनाच्या सूचनेनुसार हार-तुरे आणि पारंपरिक सत्कार समारंभ टाळण्यात आले.

आतार म्हणाले, दुष्काळामुळे सर्वच घटक अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत राजकीय पक्षभेद आणि आर्थिक स्तर बाजूला ठेवून गरजूंना मदत करण्याची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे. मदत केवळ पैशांतूनच होते असे नाही; दिलासा देणारे दोन शब्द आणि आधाराची थापही संकटातील व्यक्तीला जगण्याचे बळ देऊ शकते. सामाजिक कार्यात प्रत्येकाने आपले योगदान तपासण्याची गरज आहे.

संत वामनभाऊ तरुण मंडळाने वर्षभर गणेशोत्सवासह विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले. महिला व युवतींसाठी लेझीम, टाळ आणि दांडिया पथकांची स्थापना करून संघभावना वाढविण्याचे काम केले. तर संतोष गायकवाड यांनी दिवाळीचा आनंद गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला, असेही आतार यांनी सांगितले.

यावेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, नगरसेविका सविता भापकर, भाजप युवा मोर्चाच्या मागासवर्गीय आघाडीचे प्रदेश सचिव नितीन एडके, पत्रकार अनिल खाटेर, सचिन रोडी, प्रताप निऱ्हाळी, ज्योती शर्मा, शीला बडे, जय भवानी मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र कोटकर, संस्थापक अनिल नागापुरे, बबलू खोर्दे, संस्थेच्या संस्थापक अनिता निराळी, मनसेचे संतोष जिरेसाळ, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सुखदेव मर्दाने आदी उपस्थित होते. सचिन वायकर, सविता भापकर आणि संतोष गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य संयोजक व शिवचरित्राचे अभ्यासक सचिन नागापुरे यांनी केले. सूत्रसंचालन सिद्धार्थ गायकवाड यांनी केले, तर आभार संतोष गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भूषण नागापुरे, बंटी जेधे, अशोक जेधे, दीपक माने, दीपक बाफना, सुभाष भागवत, सुजल गाडे, अंजना गायकवाड, मंदाकिनी तुपे, सारिका जेधे, चंद्रकला गायकवाड, मुक्ता केसभट, अर्चना रोडी आणि योगाभ्यासक अशोक पालवे यांनी परिश्रम घेतले.